गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक ९१ वा ● सोमवार १९ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 91 | Date : 19/08/2024 | blow Monday | Page 4 Price 4

# घरगुती वीजग्राहकांना शून्य वीजबिल, शेतकऱ्यांना मोफत

## मुख्यमंत्री शिंदेनी सांगितला सरकारचा प्लॅन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सातारा: राज्य शासनाने गेल्या अडीच वर्षांत सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून वीजक्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना एप्रिलपासून पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यात येत आहे. तर मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना व मागेल त्यांना सौर कृषिपंप



योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. सोबतच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीजग्राहकांचे वीजबिल देखील शून्यवत होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी व घरगुती वीजग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी दिली.

पाटण तालुक्यातील (जि. सातारा) मान्याचीवाडी गावामध्ये महावितरणच्या वतीने १०० टक्के सौर ऊर्जीकरण करण्यात आले आहे. राज्यातील पहिले 'सौरग्राम' झालेल्या मान्याचीवाडीचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. वीजक्षेत्रात राज्य शासनाने केलेल्या कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसेच पहिल्या सौरग्रामचे सरपंच श्री. रवींद्र माने यांचे त्यांनी जाहीर अभिनंदन केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री ना. श्री. शंभूराज देसाई, महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, मान्याचीवाडीचे सरपंच श्री. रवींद्र माने आणि महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी गावाने राज्यात पहिले सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. या गावातील प्रत्येक नागरिकाचे मी अभिनंदन करतो. सौर ऊर्जा ही प्रामुख्याने घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांसाठी । पान २ वर

## भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांचं निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

चेन्नई : भारतीय समुद्र सुरक्षा बल म्हणजेच भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांचे आकस्मित निधन झाले. राकेश पाल यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने चेन्नई येथील रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांनी ट्विटरवरुन राकेश पाल यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली



वाहिली आहे. राकेश पाल यांना सकाळपासून अस्वस्थ वाटू लागल्याने चेन्नईतील राजीव गांधी सार्वजनिक रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. मात्र, आज त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राकेश पाल हे AVSM, PTM, TM येथील भारतीय तटरक्षक दलाचे २५ वे महासंचालक होते. तसेच, ते भारतीय नौदल अकादमीचे माजी विद्यार्थीदेखील होते, जानेवारी १९८९ मध्ये ते भारतीय तटरक्षक दलात रुजू झाले होते.

## आयएएस पदाचे खासगीकरण करून आरक्षण संपविण्याचा डाव; राहुल गांधींची टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : केंद्र सरकारमध्ये सहसचिव, संचालक आणि उपसचिव या पदांवर लवकरच परीक्षा न घेता विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची भरती केली जाईल. केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) विविध



मंत्रालयांमध्ये भरण्याच्या ४५ जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. यामुळे परीक्षा न घेताच वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांची महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती करण्याचा मोदी सरकारची योजना यापुढेही सुरू राहणार आहे. या योजनेवर आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली आहे. मोदी सरकार या माध्यमातून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसींचे आरक्षण संपवून त्यांच्या जागा दिवसाढवळ्या चोरत आहेत, असाही आरोप राहुल गांधी यांनी केला. प्रशासनातील उच्च पदांवर यूपीएससीद्वारे उमेदवार न निवडता ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इशाऱ्यावर नेमले जाणार आहेत. हा पंतप्रधान मोदींचा एकप्रकारे संविधानावर हल्ला असल्याचा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. प्रशासनातील सहसचिव, संचालक आणि उपसचिव या पदांसाठी यूपीएससीकडून आयएएस, आयपीएस आणि आयएफओएस उमेदवार निवडले । पान २ वर

## एकही मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये; मतदार नोंदणी अधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्र्वभुमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात या वर्षीच्या दुसर्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. त्यानुसार दि. ६ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदारयादी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्या यादीमध्ये अजुनही ज्यांची नावे समाविष्ठ नाहीत, अशा मतदारांची नोंदणी करावी. तसेच १८ वर्षे वय पुर्ण असलेल्या पात्र युवक व युवती यांची मतदार नोंदणी करून घेण्यात यावी. एकही मतदार मतदार नोंदणीशिवाय शिल्लक राहू नये, याची दक्षता घ्यावी, असा सुचना मतदार नोंदणी अधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्र्वभुमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात या वर्षीच्या दुसर्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. त्याअनुषंगानेर मतदार नोंदणी अधिकारी सचिन इथापे यांनी पंढरपूर विधानसभा मतदार संघाकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय सांस्कृतिक भवन पंढरपूर येथे सर्व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, पर्यवेक्षक, मंडळ अधिकारी, तलाठी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीमध्ये त्यांनी सुचना दिल्या आहेत.

लोकसभा निवडणूकीपुर्वी पंढरपूर पंढरपूर विधानसभा मतदार संघामध्ये वगळण्यात आलेल्या मयत, दुबार व । पान २ वर



## महसूल खात्यात काम करताना माणसे वाचता आली पाहिजेत

### यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांचे प्रतिपादन

*** शासनाच्या सर्व महत्वपूर्ण योजनांची जबाबदारी महसूल विभागावरच असते : निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार * यावेळी शेखर गायकवाड लिखित रंग महसुली या पुस्तकाचे प्रकाशन * महसूल पंधरवडा सांगता समारंभ व कौतुक सोहळा संपन्न**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी: शासनाच्या अनेक विभागापैकी महसूल विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाच्या सर्वसामान्य लोकांशी दैनंदिन संबंध येतात. तसेच प्रशासकीय स्तरावर महसूल विभाग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने सर्व यंत्रणाच्या समन्वयाचे काम येते. त्यामुळे अशा विभागात काम करत असताना माणसे वाचता आली पाहिजेत. कामाचा आनंद घेता आला पाहिजे. जो अधिकारी कर्मचारी हे काम करेल त्याची महसूल विभागातील सेवा उत्कृष्ट असेल, असे प्रतिपादन पुणे येथील यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी केले. महसूल पंधरवडा निमित्त रंगभवन सभागृह येथे आयोजित सांगता समारोप कार्यक्रमात श्री.गायकवाड मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह होत्या. तर निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडल अधिकारी, तलाठी, महसूल सहायक, अव्वल कारकून, शिपाई, वाहनचालक तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने दि. ०१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान महसूल पंधरवढा सर्व तहसिल कार्यालये उपविभागीय कार्यालये व जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांमध्ये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून यशदचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड हे सपत्नीक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्रीमती मनिषा कुंभार यांनी पंधरवडयातील केलेल्या कामांची माहिति सांगितली, तसेच महसूल विभाग हा । पान २ वर

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हाल सुरू, सुरळीत बस सेवा पूर्वी प्रमाणे न सोडल्यास पालकांनी करणार आंदोलन

## किलो मिटरच्या सक्तीमुळे अक्कलकोट आगाराच्या एस टी बस गाडया रिकाम्या फिरू लागल्या; गाड्यांची कमतरता असतानाही सोलापूरला सात मुक्काम

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/कमलाकर सोनकांबळे: अक्कलकोट एस टी डेपोच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी पणामुळे अक्कलकोट तालुक्यील एस टी ची सेवा विस्कळित झाली असुन गरज नसताना ग्रामीण भागातील फेऱ्या रद्द करून दररोज १५ ते २० गाड्या पुण्याला रिकाम्या पळवल्या जात आहेत. तर गाड्यांची कमतरता असतानाही सोलापूरला गरज नसताना सात मुक्काम ठेवले आहेत. केवळ सर्व्हिस जपण्यासाठी आणि एस टी चे अर्थिक तोटा वाढविण्यासाठी आणि सोलापूर मुक्कामाला गरज नसताना व कोणत्याही प्रवाशांची मागणी नसताना सात गाड्या मुक्कामसाठी चालवल्या जात आहेत.

अक्कलकोट आगाराचां हम करेसो कायदा आणि मनमानी पद्धतीने कामकाज करणे यामुळे एस टी गाड्या अक्कलकोट तालुक्यांत रिकाम्या फिरू लागल्या आहेत.

दुसरी गंभीर बाब म्हणजे किलो मिटर च्या सक्तीमुळे अक्कलकोट आगाराच्या एस टी गाडया सद्या रिकाम्या फिरू लागल्या आहेत आंबेवाड मुक्काम ही गाडी जाते जाते येते वेळी रिकाम्या धावत आहेत परंतु याचे कसलेही सोयर सूतक स्थानक प्रमुख यांना हि नाहीं आणि डेपो मैंनेंजर यांना ही राहिले नाही केवळ डिझेल जास्त लागले कमी केपीटीएल आणले म्हणुन दररोज चालक वाहकांना पंख्याची थंडगार हवा खात कार्यालयात बसलेले डेपो मेनेजर यांना तालुक्यात कोणत्या गावाला कोणत्या वेळी गाडी जायला हवी याचे कसलेही ज्ञान नाही अक्कलकोटच्या भौगोलिक परिस्थितीची माहिती नाही असा अडाणी डेपो मॅनेजर अक्कलकोट डेपोला यापूर्वी कधीही लाभला नव्हता परंतु केवळ दिवसभर कागदी घोडे नाचवत आणि फायलीची डोंगर रचत बसलेले हे डेपो मॅनेजर महाशय एस टी बस गाड्याच्या स्वच्छतेकडे ही दुर्लक्ष करून अक्कलकोट तालुक्यातील जनतेसाठी अस्वच्छ गाडया मार्गावर पाठवत आहेत.



उडचण आणि शिवूर मुक्कामच्या गाडया दुसऱ्या दिवशी एकामागे एक जात असल्यामुळे या दोन्ही गाडया प्रवाशी नसल्यामुळे रिकाम्या जात आहेत याबाबत विचारणा केली असता वरूनच डायनिंग आले आहे यात काही ही बदल करता येत नाही अशी गोलमाल उत्तरे डेपो मॅनेजर चालकाना देत असतात. केवळ किलो मिटरच्या सक्तीमुळे एस टी गाडया रिकाम्या फिरवण्याची दुर्दैवी वेळ चालकावर आली आहे.

अक्कलकोट डेपोला केवळ ६५ गाड्यांची संख्या असताना पुणे मार्गावर दररोज विनाकारण २० गाडया पाठवल्या जात आहेत अक्कलकोट तालुक्यात गावोगावी आणि गरजेच्या ठिकाणी गाडया न सोडता दररोज पुणे मार्गावर २० गाडया सोडण्याचा अट्टाहास कशासाठी असा सवाल प्रवाशी वर्गमधून केला जात आहे.

पुणे मुंबईला जाणारे प्रवाशी सोन्याचे नाणे देतात आणि ग्रामीण भागातील प्रवाशी काय लोखंड देतात काय? असा सवाल करुन प्रवाशांनी म्हणाले आहे की, जर अक्कलकोट तालुक्यात पुरेशा गाड्या सोडल्या नाहित तर पुण्याला जाणाऱ्या सर्व एस टी बस गाड्या अडवून आंदोलन केले जाईल.

इतकेच नाही तर सोलापूर जिल्ह्यात काय इतर डेपो नाहित काय अक्कलकोटच्या डेपोला अगोदरच एस टी बस कमी असताना पुणे साठी दररोज २० गाडया कशा साठी सोडल्या जात आहेत याची चौकशी करावी अन्यथा याबाबत ची तक्रार मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात येईल असा इशारा वागदरी, दुधनी, मैंद्रगी, कोन्हाळी, किरणळी या भागातील प्रवाशांनी दिला. आहे.

विशेष गंभीर घटना म्हणजे ग्रामीण भागातील मुक्काम बंद करण्यात येवुन सोलापूर ला सात मुक्काम कशा साठी सुरू ठेवण्यात आले आहेत यात कुणाचा इंटरेस्ट आहे कोणाला आर्थिक मलिदा मिळत आहे असेही शंका व्यक्त केल्या जात आहेत.गाड्यांची कमतरता असतानाही सोलापूरला सात मुक्काम चालवून वारंवार घोळसगाव आणि मडी सलगर मुक्काम बंद करण्यात येते आबेवाड मुक्काम ची गरज नसताना तिथे मुक्काम सूरू ठेवण्यात आला आहे केवळ सलगर पर्यंतच ४ ते ५ प्रवाशी असतात सलगरच्या पुढे एक ही प्रवाशी नसतो

मुरूम मुक्काम उमरगा मुक्काम लातूर मुक्काम बंद पाडणारे याच अक्कलकोटचे एस टी बस स्थानकातील कामचुकार कर्मचारी आहेत लोकांचा गाड्या सोडण्याचा तगादा मागे लागु नये म्हणुन आणि केवळ स्वतःला वाचविण्यासाठी वाहतूक नियंत्रक वारंवार घोळसगाव किंवा मडी सलगर मुक्काम बंद करण्यात धन्यता मानत असतात. किंवा अनेक ठिकाणीं एस टी बस न सोडता किलो मिटर करून घेण्यासाठी एस टी बस सोडण्यात अक्कलकोट डेपोचा पहिला नंबर आणण्यासाठी बस स्थानकातील सर्वच वाहतूक नियंत्रक कामे करत असतात याकडे कागदी घोडे नचवणारे डेपो मॅनेजर पद्धतशी दुर्लक्ष करतात.

**किरनळी मार्गे घोळसगाव मुकाम बस हे अत्यात गरजेचे असून सदर बसमध्ये कॉलेज हून येणारे युवक युवती वयोवृद्ध जेष्ठ व्यक्ती, व शालेय मुळे यांचे गैरसोय होत आहे पालक लोकांनी शाळेला गेलेले मुली कधी येथील यांचे वाट बघत असतात शासनाने शालेय मुलांना शाळेत जाऊन पास दिले आहे मग बसची व्यवस्था कोण करणार यांची जॉब जिल्हा व्यवस्थापक आणि परिवहन मंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात करून आंदोलन छेडण्यात येईल**

**असलम मुल्ला, सामाजिक कार्यकर्ता किरनळी**

# संपादकीय

## त्याची मदत होईल...

आश्रमशाळांमधील बारा हजारांवर विद्यार्थ्यांना सरकारकडून कौशल्य विकासाचे धडे दिले जाणार आहेत. त्यात नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी सहा हजार विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे कौशल्य कमावले, असे प्रसिध्द झालेल्या एका बातमीत म्हटले आहे. भारतात बेरोजगारीचा दर वाढत आहे. तो ४५ टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या नुकत्याच प्रसिध्द झालेल्या अहवालातही याविषयी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. बेरोजगारीची अनेक कारणे तज्ज्ञ सांगतात, पदवीधर तरुणांमध्ये किमान कौशल्ये आढळत नाहीत. रोजगाराची क्षेत्रे बदलत आहेत. नवनवीन क्षेत्रे उदयास येत आहेत. गेल्या एक दशकापर्यंत त्याचा अंदाजदेखील व्यक्त केला गेला नसेल. परिणामी भविष्यकाळाचा वेध घेऊन शिक्षण कौशल्ये आणि रोजगार यांची सांगड घातली जावी, असे आवाहन करण्यात येत आहे. रोजगार मिळवण्याबरोबरच तरुणाईने स्वयंरोजगार निर्माण करणे जाणत्यांना अपेक्षित आहे. त्या दृष्टीने कौशल्य विकासाची योजना राबवण्याचा सरकारचा कदाचित तो प्रयत्न असावा, बेरोजगारीवर मात करण्यासाठी रोजगार प्रशिक्षण आणि रोजगार निर्मिती हाच व्यवहार्य उपाय आहे. सरकारी आणि खासगी पातळीवर मुलांची कलचाचणी केली जाते. योग्य प्रशिक्षण मिळाले तर त्यातील अनेकांना त्यांची भविष्याची दारे खुणावू शकतात. वयाच्या त्याच टप्प्यावर १९ प्रकारची कौशल्ये शिकवली जाणार आहे. तथापि त्याकरिता योजनेची नियोजनपूर्वक अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. सरकारी योजनांना 'फाइलबंद' होण्याचा शाप आढळतो. राबवल्या गेल्या तरी योजना राबवली हा शेरा मारणे एवढाच त्यामागचा उद्देश आढळतो, योजनेचा लाभ मिळवण्यासाठी बऱ्याच कागदपत्रांचे भेंडोळे सादर करावे लागते, असा जनतेचा अनुभव आहे. ती कागदपत्रे जमवताना इच्छुकांच्या नाकीनऊ येते. त्यामुळे लाभ नको, पण कागदपत्रे आवर, अशी भावना लोक व्यक्त करतात. या योजनेच्या बाबतीत तसे होणार नाही याची दक्षता सरकारने घेतलीच असेल. सरकारी योजनांची जशी घोषणा केली जाते त्याचप्रमाणे त्या योजनांच्या अंमलबजावणीचा अहवालही जाहीर केला जाईल का? गेल्या वर्षी सहा हजार विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण दिले गेल्याचा दावा केला गेला आहे, पण या आकड्यासोबतच प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल झाले? हेही जाहीर केले गेले तर बरे! योजनेची विश्वासार्हता वाढायला त्याची मदत होईल.

# किरनळी येथील सरपंचावर अविश्वास ठराव मंजूर

## सरकारी चावडी जागेला बेकायदेशीर बांधकाम करण्यास सरपंच विरोध केल्याने अविश्वास,जागेच विषय पेटला

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील मौजे किरनळी येथील भाजपचे सरपंच महानंदा कणमुसे यांच्या विरोध अविश्वास ठराव मंजूर करण्यात आले आहे या सर्व प्रक्रिया मध्ये किंग मेकर ठरले आहे काँग्रसचे पुढारी यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत कुणाला बसेल फटका यांची चर्चा संध्या जोरात चालू आहे. किरनळी गावात जुनी महसूल विभागाचे कार्यालय चावडी व ग्रामपंचायत नावाने नोंद आहे एका समाजाने त्या ठिकाणी सभागृह बांधण्याकरिता सदर कार्यालय बेकायदेशीर ग्रामपंचायत सदस्या यांचे पती संजय कोळेकर व गावातील इतर ३ जण यांनी बाधकाम पाड काम करीत असताना सरपंच यांनी त्याला रोखण्यासाठी गेले असता त्यांनी सरपंच सोबत भांडण करुन बाधकाम पाडले त्याबाबत सरपंच ग्रामसेवक पोलीस व तहसीलदार यांना कळवून पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यास गेले असता वरिष्ठ पातळीवर गुन्हा दाखल करू नका मी त्यांना समजावून सांगतो असे शिष्टमंडळ सांगितले त्यामुळे फक्त लेखी निवेदन पोलीस स्टेशनला दिले असता त्यावर अद्यापही कार्यवाही करण्यात आले नाही तेव्हापासूनच चालू झाले राजकीय खेळ त्यामध्ये काँगेस सोबत भाजपचे काही मंडळी अविश्र्वास दाखल करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे माहिती सूत्रांनी सांगितले आहे

अविश्र्वास ठराव बाबत दि १६/०८/२०२४ रोजी ठीक अकरा वाजता ग्रामपंचायत किरनळी येथे सभा घेण्यात आले त्यात सहा सदस्याने विरोधात मतदान केल्यामुळे अविश्र्वास ठराव मंजूर करण्यात आले. सरपंच यांनी दहा मिनिट उशिरा गेल्याने



चावडी या शासकीय जागेवर अतिक्रमण करून बेकायदेशीर बाधकाम करण्यासाठी सहा सदस्याने माझ्यावर दबाव आणले होते मी बेकायदेशीर काम करणार नसल्याचे सांगितल्यावर माझ्यावर अविश्र्वास दाखल केले आहेत याबाबत मी न्यायालयीन लढा देणार आहे व यापुढे ही शासकीय जागेचे बेकायदेशीर वापर करू देणार नाही **–महानंदा चंद्राम कणमुसे,किरनळी**

त्यांना सर्व मुद्दे खोडण्यास पुरेसा वेळ दिले नाही फक्त त्यात अमान्य असल्याचे येवढेच घेतले आहे दिनांक २/८/२०२४ रोजी सहा सदस्य यांनी लेखी अर्ज सरपंच ग्रामसेवक यांच्या नावे देऊन सदर शासकीय जागेत अहिल्यादेवी होळकर सभागृह बाधकाम करण्याबाबत अर्ज दिले असता सरपंच यांनी जिल्हाधिकारी यांचे परवानगी आणून काम करा असे तोंडी सांगितले असता ते काय माहित नाही कायदा गेलं खड्यात आम्हाला येथे करायचं आहे नाहीतर अविश्र्वास करू असे म्हणून अविश्र्वास दाखल दि. ८/८/२०२४ केले होते सरकारी जागेत चावडी पाडून जर अतिक्रमण करून बेकायदेशीर कामे करीत असल्यास त्याठिकाणी लिंगायत समाज नाराज आले आहेत सर्व सहा सदस्य अतिक्रमण करून बेकायदेशीर ठराव घेऊन त्याठिकाणी बाधकाम केल्यास त्याविरुद्ध लिंगायत समाज जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार देणार असल्याचे चर्चा आहे शासकीय कार्यालय पाडून त्याठिकाणी अतिक्रमण करून बाधकाम करण्यास विरोध केल्यामुळे सरपंच विरोध अविश्र्वास दाखल होण्याचे पहिलीच घटना असल्याचे चर्चा चालू आहे

# इंदापूर महाविद्यालयात रंगली काव्यमैफिल




**दैनिक यशसिद्धी न्युज**

इंदापुर/अतुल सोनकांबळेः इंदापूर येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयांमधील कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठी विभागाने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री आणि संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे ,उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. दत्तात्रय गोळे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये कविता रुजविण्यासाठी तसेच त्यांच्यातील सृजनशीलतेला वाव देण्यासाठी असे कार्यक्रम आवश्यक आहेत.विद्यार्थ्याबरोबरच प्रा.संतोष पानसरे , प्रा.राजीव शिरसट , प्रा. अमित दुबे , प्रा.कल्याणी देवकर , प्रा.शरद पवार, प्रा.अभिजित भोसले, प्रा.प्रसाद गायकवाड यांनी देखील कविता सादर केल्या.

काव्य-वाचन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. युवराज फाळके, प्रा.अभिजीत भोसले, प्रा.शरद पवार आणि प्रा.कल्याणी देवकर यांनी कार्य केले. प्रा.भारत शेंडे, प्रा.सुनील सावंत, प्रा.आबासाहेब घोळवे, प्रा.रवींद्र हगवणे,प्रा.हर्षवर्धन सरडे, प्रा.सागर गुजराथी,प्रा.रवींद्र साबळे, प्रा.अमोल मगर, प्रा.रोहिदास भांगे उपस्थित होते.प्रा.संतोष पानसरे यांनी काव्यवाचन स्पर्धेचे सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# ग्रामसेवक संघटनेच्या अध्यक्षपदी नीलेश म्हात्रे



**दैनिक यशसिद्धी न्युज**

भिवंडी/मिलिंद जाधव :भिवंडी ग्रामसेवक संघटनेची दोन वर्षे प्रलंबित असलेली पंचवार्षिक निवडणूक एल. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात शुक्रवारी घेण्यात आली. यावेळी भिवंडी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष म्हणून नीलेश सुरेश म्हात्रे यांची निवड करण्यात आली. तर सचिवपदी परेश सोनावणे, उपाध्यक्षपदी संतोष भाकरे, जागृती ढलपे, सहसचिवपदी विलास पाटील, कोषाध्यक्षपदी प्रफुल म्हात्रे, संघटकपदी काशीनाथ माळी, योगिता सांबरे व कायदेशीर सल्लागारपदी हिरामण खाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे, विस्तार अधिकारी व ग्रामविकास अधिकारी आदींनी अभिनंदन केले.

पान १ वरुन

## एकही मतदार नोंदणीपासून..

स्थलांतरीत मतदारांची घरोघरी जाऊन पुनश्र्च एकदा खात्री करून त्यांचे नाव चकुन वगळण्यात आले आहे का? याबाबत त्यांचे घरी जाऊन खातरजमा करून घ्यावी. तसेच मतदारसंघ वाढ झाल्यामुळे एकूण वीस मतदार केंद्रामध्ये वाढ झालेली आहे. नवीन मतदान केंद्र तसेच स्थलांतर करण्यात आलेली मतदान केंद्र आणि विलीनीकरण करून तयार झालेली मतदान केंद्रे याबाबत मतदारांना सूचना द्याव्यात, सूचना देण्यात आल्या आहेत. याव बैठकीस निवडणूक नायब तहसीलदार वैभव बुचके, राजेश सावळे, महसूल सहाय्यक आर. आर. शिंदे, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, पर्यवेक्षक, मंडळाधिकारी, तलाठी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते.भारत निवडणूक आयोगाने दि. १७ व १८ ऑगस्ट रोजी विशेष मोहीमेचे आयोजन केले. या मोहीमेत सर्व पात्र नागरीक, १८ वर्षे पुर्ण केलेल्या युवक व युवती यांची जास्तीत जास्त मतदार नोंदणी करण्यात आली. मतदार लिंग गुणोत्तराचे प्रमाण वाढविण्यात यावे. आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये कोणाचीही तक्रार येणार नाही याची दक्षता घेणेबाबत सुचना दिल्या आहेत.

## घरगुती वीजग्राहकांना शून्य ..

वरदान ठरत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. तसेच राज्य शासनाने मागेल त्यांना सौर कृषिपंप योजना जाहीर केली असून खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के रक्कम तर अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना पाच टक्के रक्कम भरून साडेसात अश्र्वशक्तीपर्यंत कृषिपंप व सौर पॅनेल्स मिळणार आहे. उर्वरित रक्कम राज्य शासन अनुदानातून देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध होत आहे. तर येत्या दीड वर्षांमध्ये राज्यात सौर ऊर्जेद्वारे १२ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. ही वीज शेतकऱ्यांना दिवसा देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही. राज्याने सौर ऊर्जेमध्ये मोठी आघाडी घेतली आहे. राज्यात पहिले सौर ग्राम म्हणून मान्याचीवाडीचे आज लोकार्पण झाले याचा आनंद आहे. या गावात पूर्वी ५ लाख २५ हजार रुपयांचे वीजबिल येत होते. ते सौर ग्राममुळे शून्य झाले आहे. आता राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु असून त्यासाठी गावांची निवड झाल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

## महसूल खात्यात काम करताना

शासनाकडून दिल्या गेलेल्या सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पेलत असल्याने शासनाच्या सर्व महत्वाच्या योजना राबवण्याची जबाबदारी आवर्जुन महसूल खात्याकडे दिली जाते. याचा सर्व महसूल विभागाना सार्थ अभिमान आहे. या महसूल पंधरवाड्यात मा. जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांनी महसूल पंधरवाडा यशस्वी होण्यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन केले व महसूल कार्यालयांनी अंमलबजावणी केली असल्याचे सांगितले. महसूल पंधरवड्यानिमित्त आयोजित स्वच्छ सुंदर कार्यालय या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यात मोहोळ तहसिल कार्यालयाला तहसिल स्तरावर, उपविभागीय अधिकारी कार्यालय, माळशिरस, अकलूज यांना उपविभाग स्तरावर तर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखा यांना जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरील सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक देण्यात आला.

त्यानंतर सर्वोत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

तहसिलदार संवर्गातील सर्वोत्कृष्ट ठरलेले मंगळवेढा तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, उपविभाग माळशिरस तसेच विविध जिल्हास्तरिय विविध संघटनांचे अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर सोलापुरच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले व येणाऱ्या प्रत्येक नागरिकांशी सौजन्याने व सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वर्तन केले पाहिजे अशा मौलिक सूचना दिल्या. महसूल विभागातील कर्मचारी / अधिकारी यांच्या १० वी व १२ वी तील उत्कृष्ट गुण मिळवलेल्या पाल्यांचा सत्कार सोहळा पार पडला.

*रंग महसुली या पुस्तकाचे प्रकाशन:-

श्री. शेखर गायकवाड लिखित रंग महसुली या महसूल खात्यात काम करताना भेटलेल्या बहुरंगी व्यक्तिमत्व असलेल्या लोकांचे किस्से असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांचे हस्ते करण्यात आले. महसुली अधिकारी यांचे समक्ष पुस्तक प्रकाशन करण्याचा शेखर गायकवाड सरांचा मानस होता, ती संधी सोलापूरच्या महसूल विभागाला मिळाल्याचा आनंद सर्वांनी व्यक्त केला. यावेळी शेखर गायकवाड यांनी आपल्या भाषणातून सर्व उपस्थित महसूली अधिकारी कर्मचारी यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच महसूल खात्यात काम करताना माणसं वाचता आली पाहिजेत तसेच कामाचा आनंद घेता आला पाहिजे अन्यथा काम फार एकसुरी होईल अशा भावना व्यक्त केल्या. आपल्या भाषणामध्ये आपल्या कारकीर्दीतील अनेक किस्से आपल्या खास शैलीमध्ये त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती मनिषा कुंभार तर सुत्रसंचालन अमृत नाटेकर यांनी केले.

सर्वात शेवटी उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी आभार व्यक्त केले. व महसूल प्रशासनाने यशस्वी केलेल्या महसुली पंधरवड्यास संपूर्ण जिल्ह्यातून महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयएएस पदाचे खासगीकरण ..

जातात. मात्र आता खुल्या पद्धतीने या पदांवर उमेदवार निवडले जाणार आहेत.राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करून या निर्णयाचा विरोध केला. ते म्हणाले, केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयातील उच्च पदावर बाहेरून उमेदवार निवडून मोदी सरकार एकप्रकारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसींचा हक्क हिसकावून घेत आहे. त्यांच्या आरक्षणाला यामुळे नख लागत आहे. मी हे वारंवार सांगत आलो आहे की, सरकारमधील महत्त्वाच्या पदांवर उपेक्षित घटकांतील अधिकारी नियुक्त केलेले नाहीत. यात सुधार करायचा सोडून केंद्र सरकार आता खुलेआम बाहेरून उमेदवार आयात करून उच्च पदांवर त्यांना बसविणार आहे.जे युवक-युवती यूपीएससीसाठी मेहनत करतात त्यांच्याही अधिकारावर यामुळे गदा येणार आहे. तसेच मेहनती आणि प्रामाणिक उमेदवारांना डावलले जाणार आहे. यामुळे आरक्षणासारख्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला तडा जात आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.या राष्ट्रविरोधी धोरणाचा इंडिया आघाडीकडून कडाडून विरोध केला जाईल. भारताची प्रशासकीय यंत्रणा आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला या निर्णयामुळे मोठा धक्का बसेल. तसेच आयएएस सारख्या पदाचे खासगीकरून करून आरक्षण संपविण्याची ही मोदी गॅरंटी असल्याची जळजळीत टीकाही लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली.

# नाशिक जिल्हा सुपर फिफ्टी मध्ये सिद्दी वाडेकरचे घवघवीत सुयश

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सिद्दी रामदास वाडेकर हीने नाशिक जिल्हा परिषदेने सुपर फिफ्टी या उपक्रमांतर्गत निवड चाचणी स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश प्राप्त करून विद्यालयाच्या शिरपेच्यात यशाच्या मानाचा तुरा रोवला.



तिने अथक परिश्रम करून यश संपादन केले. जिद्द,कष्ट व अभ्यासू वृत्ती या तीन गोष्टीमुळे तिला यश मिळाले.तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मविप्र संस्थेचे सरचिटणीस अडओकॅटे नितीन भाऊ ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत,संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके,शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने,पालक – शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे,विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे . तिला मुख्याध्यापक रामदास वाजे,पी.आर.करपे,सोमनाथ गिरी,सोमनाथ पगार,दिगंबर जाधव, अरुण डावरे, डी.ए.रबडे,राजेंद्र गांगुर्डे, मारुती डगळे ,रेवणनाथ कांगणे, सीमा गोसावी,शिवनाथ हुजरे, सुनिल ससाणे, वडील रामदास वाडेकर, आई सविता वाडेकर आदींसह सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

# राज्यात सात दिवसांत जोरदार पाऊस पडणार, पंजाबराव डख यांचा अंदाज

मुंबई : राज्यातील शेतकरी राजासाठी आनंदाची बातमी आहे. राज्यात १८ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट या सात दिवसात राज्यात जोरदार पाऊस पडणार आणि आठवडाभर वरुण राजा हजेरी लावणार असल्याचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केलाय.

मुंबईतही या दरम्यान पाऊस पडेल. याशिवाय विदर्भातील बुलढणा, अकोला, अमरावती, वर्धा ,नागपुर ,यवतमाळ या जिल्ह्यात पाऊस हजेरी लावेल. तर मराठवाड्यात हिंगोली, नांदेड, लातूर, बीड परभणी ,जालना, छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्ह्यात पाऊस बरसेल, असा अंदाजही डख यांनी व्यक्त केला. शिवाय उत्तर महाराष्टात नाशिक , नंदुरबार आणि धुळ्यात पाऊस पडेल, तर पश्र्चिम महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यात पाऊस पडू शकतो, असंही डख यांनी स्पष्ट केलं.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पेपर विक्रेते कोष्टी बाबांचा निफाड पोलीसठाण्या तर्फे सन्मान




**दैनिक यशसिद्धी न्युज**

निफाड/प्रतिनिधी : कर्म हिच पुजा समजून वृध्दापकाळात हि न थकता आळसाला बाजूला सारून उन,वारा, पाऊस,यांची तमा न बाळगता वाचकप्रिय ग्राहकांना ताज्या बातम्यांचा खजिना दैनिकांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन वाटप करणारे , तरुणांना लाजवेल असा कर्मयोगी.निफाड पंचक्रोशीत सुपरीचित असनारे नाव कोष्टी बाबा उर्फ मधुकर मरडे यांच्या कामाची दखल घेऊन स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून निफाड पोलीस ठाण्याच्या वतीने सन्मान करण्यात आला आहे

निफाड शहर व परिसरात गेली अनेक वर्षे अव्याहतपणे पहाटे पासुन आपल्या सायकलवर तर कधी पायी प्रवास करून पेपर वाटण्याचे काम करणारे कोष्टी बाबा . वृध्दापकाळात हि रोज पेपर वाटतात, चांगले काम करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली तर त्या व्यक्तीला काम करण्यास आणखी बळ मिळते,या उदात्त हेतूने निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी १५ऑगष्ट रोजी कोष्टी बाबांचा शाल , श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, व समाजा समोर एक चांगला आदर्श ठेवला आहे या वेळी पोलीस उपनिरीक्षक आनंद पठारे, ईश्र्वर पाटील, विश्र्वनाथ निकम, राजेंद्र बाविस्कर, पोलीस हवालदार कपालेश्र्वर ढिकले,राजु मनोहर, नितीन सांगळे, राजेंद्र दरोडे,भारत पवार, सुनील सानप, आदी उपस्थित होते ,

# पत्रकारांकरिता हवे स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ वसंत मुंडे ह्यांची मागणी; बारामतीत पत्रकारांशी संवाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

बारामती : राज्यातील पत्रकारांचे जीवन-मरणाचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शनिवारी (दि. १७) केली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या दीक्षाभूमी (नागपूर) ते मंत्रालय (मुंबई) पत्रकार संवाद यात्रा दुसऱ्या टप्प्यात काल बारामती येथे पोहोचली. तेथे आयोजित पत्रकार संवाद मेळाव्यात श्री. मुंडे बोलत होते. आमदार व माजी मंत्री दत्तात्रेय भरणे, पंचायत समितीचे सभापती प्रवीणभैया माने, बारामती पत्रकार संघाचे अध्यक्ष निळकंठ मोहिते, संघाचे जिल्हा सरचिटणीस सागर शिंदे, पोलीस निरीक्षक संतोष घोळवे कार्यक्रमास उपस्थित होते मुंडे म्हणाले, ''आपल्या अडचणी मार्गी लावण्यासाठी पत्रकारांनी प्रगल्भ होऊन एकत्र आले पाहिजे. 'पत्रकारांच्या प्रश्नांबाबत तुमचे उत्तर काय?' असा जाब सरकारला ठासून विचारला पाहिजे. 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया'च्या धर्तीवर राज्यातील पत्रकारांसाठी स्वायत्त संस्था सरकारने स्थापन करावी. ह्या संस्थेच्या माध्यमातून पत्रकारांना अधिकृत मान्यता देण्यात यावी.'' पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्र्वास आरोटे म्हणाले की, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गोरगरिबांचे प्रश्न सोडवण्याचे काम पत्रकारांनी नेहमीच करावे, ही संघटनेची भूमिका आहे. श्री. दत्तात्रेय भरणे, श्री. प्रवीणभैया माने यांचीही भाषणे झाली.

# ओबीसी बांधव औसा विधानसभा लडवुन गड जिंकणार एल्गार मेळाव्यात निर्धार



**दैनिक यशसिद्धी न्युज**

औसा/अमर जाधव : १८/०८/२०२४ रविवारी औसा येथे ओबीसी ,भटकेविमुक्त व आदिवासिंचा एल्गार मेळावा संपन्न झाला.या मेळाव्यास निलंगा तालूक्यातील कासारशिरसी ,शिरसीवाडी आणि औसा तालूक्याक्यातील शेकेडो कार्यकरते व नेते उपस्थीत होते.मेळाव्याच्या अध्यक्षस्तानी लातुरचे भटक्याविमुक्त संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा महानगर पालिकेचे माजी सभापती हरिभाऊ गायकवाड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी नेते रामराजे आत्राम आणि ओबीसी नेते दगडूसाहेब पडिले,सुदर्शन बोराडे,भारत काळे , कृष्णा पांचाळ , अनिल शिवाजी जाधव , शंकर देविदास पांचाळ , गोरख पांचाळ, संजय पांचाळ उपस्थीत होते.या वेळी मेळाव्यात औसा विधान सभेत ओबीसी व भटक्याविमुक्तांची ७५ ते ८० टक्के लोक संख्या असल्यामुळे एकमुखी औसा विधान सभेची निवडणूक लढविण्याचा निर्धार करण्यात आला.उर्वरीत ५ मतदार संघातही चाचपणी घेऊन निर्णय घेण्याचे निश्र्चीत करण्यात आले. यामुळे सर्व ओबीसी व भटवयाविमुक्तांनी एकजुट करून लढा देण्याचा निर्धार करण्यात आला.

# बहिण भावांवर रक्षाबंधनाच्या अगोदरच काळाने घातली झडप

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मंगळवेढा रोडवर भीषण अपघात बहिण व भाऊ जागीच मृत्यू




पंढरपूर मंगळवेढा मार्गावरील गोपाळपूर हद्दीत कासार मळा येथे स्विफ्ट कार व आयशर टेम्पो या भीषण अपघातात बहिण भावाचा १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचार वाजता घडली आहे रक्षाबंधनाच्या आदल्या दिवशी बहिणीला आणायला गेलेल्या भावाला बहिणीला काळाने झडप घातल्यामुळे सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे. ऋतुजा जाधव ही पुण्याहून राखी पौर्णिमेसाठी आपल्या गावी मंगळवेढा येथे येत असताना हा अपघात पंढरपूर नजीक कासार मळा येथे झाला अपघातातील मयत ऋतुजा जाधव ही शिक्षणासाठी पुण्यात होती व सोमवारी साजऱ्या होणाऱ्या रक्षाबंधनासाठी ती एसटी बसने पंढरपूरला आली व भाऊ रोहित जाधव हा तिला आणण्यासाठी पंढरपूर गेला होता व तिला कार मधून घेऊन मंगळा येथे घरी निघाले असताना त्यातच काळाने त्यांचा घात केला

# अपरान्त साहित्य कला प्रबोधनीच्या वतीने साहित्य क्षेत्रातील विविध मान्यवरांचा सत्कार सोहळा




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे :महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकामध्ये रविवार दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी बारा वाजता अपरान्त साहित्य, कला प्रबोधिनी यांच्यावतीने मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.या सत्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री सुधारक ओलवे, कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंद देवडेकर व स्वागताध्यक्ष म्हणून डॉ.संजय खैरे , संस्थेचे सरचिटणीस सुनील हे, चिटणीस संदेश पवार हे ही उपस्थित होते.

सर्वप्रथम प्रास्ताविक करून मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले.त्याआधी काही स्थानिक गायक कलाकारानी गीते सादर केली.त्यामध्ये पत्रकार दीपक पवार यांनी वामनदादा कर्डक यांचे सुंदर गीत सादर केले.सौ. साळवे मॅडम यांनी वंदन गीत सादर केले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत स्वागताध्यक्ष डॉ.संजय खैरे यांनी केले. यानंतर संस्थेचे चिटणीस संदेश पवार यांनी प्रास्ताविक करताना संस्थेची ध्येय व उद्दिष्टे आणि आतापर्यंतची वाटचाल उपस्थितांसमोर सांगितली. यानंतर मान्यवरांचा सत्कार समारंभ करण्यात आला.सत्कार पद्मश्री पुरस्कार प्राप्त माननीय श्री. सुधाकर ओलवे यांच्या हस्ते सर्वप्रथम दलित पँथरचे संस्थापक व साहित्यिक ज.वी.पवार यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर डॉ.श्रीधर पवार,श्री. मारुती सकपाळ,श्री.सिद्धार्थ तांबे,इंजिनिअर अनिल जाधव,श्री. अशोक चाफे,श्री.प्रफुल्ल पुरळकर, स्नेहा कदम,निलेश पवार,चंद्रकांत घाडगे इत्यादी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ज.वी. पवार यांनी संबोधित केले.अपरांतच्या जानेवारी मध्ये होणाऱ्या साहित्य संगतीसाठी ही वातावरण निर्मिती असून,आपण सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे,असे सर्वांना त्यांनी आवाहन केले.शेवटी आभार प्रदर्शन आणि कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# शिक्षकांमुळे महाविद्यालये नावारूपास येतात : माजी कुलगुरू डॉ.बंडगर



**सध्या अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया सुरु असल्यामुळे स्वेरीच्या वर्धापन दिनाला पालक व विद्यार्थ्यांनी देखील हजेरी लावली होती. त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रोंगे सर म्हणाले की, 'जेव्हा आपण अभ्यास करतो तेंव्हा जगातील प्रत्येक ब्रँच चांगली असते आणि जेव्हा आपण अभ्यास करत नाही तेव्हा मात्र जगातील कोणतीही ब्रँच चांगली नसते. एकूणच अभ्यास आणि परिश्रम गोष्टी विद्यार्थ्याला कराव्याच लागतात.'**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः'कोणतेही महाविद्यालय हे तेथील शिक्षकांमुळे नावलौकिकास येत असते. शिक्षकांच्या कार्य कर्तृत्वामुळे स्वेरीला एक स्वतंत्र नावलौकिक मिळालेला आहे कारण एक पुस्तक हे दहा शिक्षकांच्या बरोबर असते आणि एक चांगला शिक्षक हा लायब्ररी प्रमाणे असतो या सूत्रामुळे 'स्वेरी' ही आज शिक्षणक्षेत्रात एक नावाजलेली शिक्षण संस्था आहे. स्वेरीमध्ये अभ्यासू शिक्षकांची मांदियाळी आहे. अशा स्थितीत विद्यार्थ्यांनी या शिक्षकांच्या कार्याचा आणि कौशल्यांचा लाभ घ्यावा.' असे आवाहन पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर यांनी केले.

गोपाळपूर येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजीनियरिंगच्या भव्य ओपन थिएटरमध्ये स्वेरीच्या २६व्या वर्धापन दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर हे सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वेरीचे सुरुवातीचे मार्गदर्शक, पंढरपूरचे माजी आमदार कर्मयोगी, श्रद्धेय कै. सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाराष्ट्र गीत आणि स्वेरी गीतानंतर प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून मागील २६ वर्षांच्या परिश्रमपूर्वक वाटचालीत स्वेरी च्या 'रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात कसे झाले' हे सांगताना सुरुवातीच्या काळात अनेक आश्रय दात्यांनी केलेले सहकार्य, स्वेरीच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे, विविध शैक्षणिक उपक्रम, त्या उपक्रमांना मिळालेले यश, संशोधन क्षेत्रातील प्रगती, सोलापुरातील नव्याने घेतलेले एस.व्ही.आय.टी. महाविद्यालय व त्याला अल्पावधीत मिळालेले यश आदी बाबत सविस्तर माहिती दिली. पुढे बोलताना माजी कुलगुरू डॉ. बंडगर म्हणाले की, 'मी बऱ्याच वेळी स्वेरीत आलो त्यामुळे स्वेरीचा जवळून अभ्यास करता आला. येथील शिस्त आणि सुसंस्कार यामुळे विद्यार्थ्यामध्ये होत असलेला बौद्धिक विकास हे भविष्यातील प्रगतीचे लक्षण आहे.' असे सांगून मित्र आणि शिक्षक कसे असावे याचे महत्व पटवून सांगितले. अधून मधून डॉ. बंडगर यांनी खुमासदार शेर-शायरीचा वापर करून प्रगल्भ विचारांची चौफेर फटकेबाजी केली. यावेळी संस्थेचे आश्रयदाते, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, शिक्षक-पालक संघाचे आबासाहेब दैठणकर, अनकढाळचे सरपंच बंडगर, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनिफ शेख, माजी अध्यक्ष व विश्र्वस्त व्ही.एस.शेलार, माजी उपाध्यक्ष व विश्र्वस्त एन.एस.कागदे, माजी उपाध्यक्ष व विश्र्वस्त अशोक भोसले, विश्र्वस्त एस.टी.राऊत, विश्र्वस्त एच.एम.बागल, विश्र्वस्त बी.डी.रोंगे, युवा विश्र्वस्त सुरज रोंगे, अभियंता अर्जुन नाडगौडा, स्वेरी अंतर्गत असणाऱ्या अभियांत्रिकी व फार्मसीचे प्राचार्य, उपप्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, चारही महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज**




पंढरपूर/प्रतिनिधी : आज ईश्र्वर वठार येथे पंढरपूर तालुक्याचे भाग्यविधाते स्वर्गीय सुधाकर पंत परिचारक यांच्या चतुर्थ स्मरणानिमित्त लोकनेते गोपीचंद पडळकर फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने व ग्रामपंचायत ईश्र्वर वठार यांच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात आले सकाळी स्वर्गीय पंतांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच नारायणराव देशमुख यांच्या उपस्थितीत माजी सरपंच नागनाथ हळणवर यांचे शुभ हस्ते करण्यात आले यावेळी ज्ञानराज भजनी मंडळ यांनी भजन कीर्तन फुले टाकण्याचा कार्यक्रम करून स्वर्गीय सुधाकर पंचांच्या पुण्य स्मृतीला अभिवादन केले यानंतर उपसरपंच विजय मिटकरी यांच्या हस्ते विविध शासकीय दाखल्यांचे रेशन कार्ड दुरुस्ती रेशन कार्ड ऑनलाइन करणे नवीन रेशन कार्ड काढणे आधार कार्ड दुरुस्ती करणे उत्पन्नाचे दाखले काढणे मुख्यमंत्री लाडके बहिण योजनेचे फार्म भरणे यांच्यासह विविध दाखल्यांचे जागेवरच वाटप करण्यात आले हा कार्यक्रम लोकनेते गोपीचंद पडळकर फाउंडेशन या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माऊली भाऊ हळणवर यांनी बोलताना सांगितले की स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक हे गोरगरीब वचित शोषित लोकासाठी काम करायचे म्हणून हा कार्यक्रम गावातील गोरगरिबांना पंढरपूरला न जाता जागेवरच सर्व दाखले मिळावेत त्यांची कामे लवकर व्हावीत याकरता हा कार्यक्रम राबवला आहे या कार्यक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला सुधाकरपंताना हीच खरी आदरांजली ठरेल असे सांगितले यावेळी तलाठी ग्रामसेवक महा-ई-सेवेचे कर्मचारी तहसील मधील पुरवठा विभागाचे कर्मचारी याचे सह गावातील ग्रामपंचायत सदस्य संत बाळुमामा आघाडीतिल पदाधिकाऱ्यांसह पंकज देवकते,ज्ञानेश्र्वर गुडंगे,भारत पांढरे, अर्जुन घोडके ,अजय देशमुख, अशोक तरंगे ,धनाजी देशमुख बापु बोरकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या सदस्यपदी माजी जिल्हा परिषद सभापती वैशाली चंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील गरीब महीलांच्यां सर्वागीण विकासासाठी झटणाऱ्या माजी जिल्हा परिषद बांधकाम व आरोग्य समिती सभापती वैशालीताई चंदे याची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या शासकीय सदस्यपदी निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. सरपंच ते जिल्हा परिषद सभापती असा राजकीय प्रवास करणाऱ्या वैशालीताई चंदे यांना प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असुन त्यांनी महीलांसाठी विवीध योजना राबवून गोरगरीब महीलांना विवीध स्तरावर मदत केली आहे. त्यांच्या या भरीव समाजसेवी कार्याची दखल घेऊन माझी लाडकी बहीण योजनेच्या सदस्यपदी निवड करण्यात आली निवड होताच तालुक्यातील महीला वर्गात उत्साहाचे वातावरण असुन त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ प्रत्येक महीले पर्यंत पोहचावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन शिवसेना ठाणे उपजिल्हाप्रमुख तसेच श्री मीनाक्षी फांऊडेशन चे संस्थापक अध्यक्ष विष्णुदादा चंदे यांच्या



मार्गदर्शनाखाली वैशालीताई चंदे यानी माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत भिवंडी तालुक्यातील सोर, वांद्रे गावातील महिलांचे व मुलींचे फॉर्म भरण्यासंदर्भात शिबीर घेऊन महीलांना योजनेबाबत मार्गदर्शन केले तर वैशालीताई चंदे याची लाडकी बहीण योजनेच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थ व महीलांच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी शिवा भुते, माधुरी दिनकर, अक्षय भोईर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# वसंतराव मुंडे,विश्वासराव आरोटे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले



**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी: दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेनिमित्त पंढरपूर येथे आले असता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे व महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्र्वासराव आरोटे व पत्रकार संघातील सदस्य संपादक पत्रकार यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तर नंतर महाराष्ट्र राज्याचे पत्रकार संघाचे पश्र्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील व तालुकाध्यक्ष श्री रामदास नागटिळक तालुका कार्याध्यक्ष संतोष मोरे पंढरपूर शहर कार्याध्यक्ष नागेश शहादापुरे रवी कोळी रोहन नरसाळे दादा कदम राजेश बदले पाटील अँड संतोष माने यांनी सर्वांनी तुळशीचा हार घालून मान्यवरांचा यशोदीत सन्मान करण्यात आला. तद नंतर त्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी संपादक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कॅनरा बँकेतर्फे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती धनादेश वाटप



**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी:कॅनरा बँक पंढरपूर शाखेतर्फे भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तुंगत (ता.पंढरपूर) येथील श्री तुंगेश्वर हायस्कुलमधील इ. ५ वी ते इ. १० वीमधील होतकरू विद्यार्थ्यांना ५ हजार ते १० हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्तीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. शाखाधिकारी चुर्तवेदी यांनी शिष्यवृत्ती मिळालेल्या होतकरू विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. सदर उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी बँकेचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फनी तेजा, हिम्मत कापसे, आशिष तिवाटणे, सेवक भोसले यांनी परिश्रम घेतले.

### मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा कार्यारंभ

# जेएनयुमध्ये कुसुमाग्रज यांच्या नावाने मराठी अध्यासनासाठी निधी देणार : मुख्यमंत्री शिंदे

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पुणे : जवाहरलाल नेहरु विद्यापीठात मायमराठीच्या जागरासाठी थोर साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या नावाने मराठी भाषेचे अध्यासन सुरू करण्यासाठी निधी देण्यात येईल, तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. दिल्ली येथे ७० वर्षानंतर होणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सर्वांनी मिळून यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, सरहद संस्थेचे संजय नहार, शैलेश वाडेकर, मिलिंद जोशी, विनोद कुलकर्णी, सुनीताराजे पवार, माजी मंत्री विजय शिवतारे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ऐतिहासिक वास्तूत भेट देण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, दिल्लीत साहित्य संमेलन होणे ही महाराष्ट्रासाठी, मराठी साहित्यप्रेमींसाठी एक अभिमानाची बाब आहे. अशा संमेलनाच्या माध्यमातून मराठी भाषेचे मोठेपण जगभरातील नागरिकांना कळायला हवे. साहित्यिकांचे समाजासाठी मोठे योगदान आहे, जीवनाचा अर्थ त्यांच्यामुळे कळतो, नवी पिढी घडविताना समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य साहित्यिक करतात. म्हणून अशा साहित्य संमेलनाचा समाज जागरणासाठी उपयोग होतो. त्यामुळे सर्वांनी एकत्रितपणे दिल्लीतील मराठी साहित्य संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन त्यांनी केले.मुख्यमंत्री पुढे म्हणाले, देशाच्या राजधानीत होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या आयोजनाला विद्येच्या माहेरघरातून सुरूवात होत आहे. मराठी संस्कृतीच्या राजधानीपासून सत्तेच्या राजधानीपर्यंत मायमराठीचा डंका वाजतो आहे. संमेलनाच्या तयारीची सुरूवात चांगली झाली असून या संमेलनाला काही कमतरता भासणार नाही. जगातल्या १२ कोटी मराठी नागरिकांना जोडणारे




हे संमेलन आहे. परदेशातही मराठी भाषा आणि संस्कृतीचा अभिमान आहे. प्रत्येक मराठी माणसांचा अभिमान असणारा हा भाषेचा उत्सव ७० वर्षानंतर दिल्लीत होत आहे.

संत नामदेवांनी भक्तीमार्गाने मराठीचा झेंडा पंजाबपर्यंत नेला होता. मराठी राज्यकर्त्यांनी देशभर पराक्रम गाजविला. मराठी माणसे जेथे गेली तिथे त्यांनी आपली भाषा आणि संस्कृती रुजविण्याचे कार्य केले. इंदोर, ग्वाल्हेर, हैदराबाद, तंजावर आदी भागात मराठी संस्कृती रुजलेली दिसते. सरहद संस्थेच्या माध्यमातून राज्याची सरहद्द ओलांडून मायमराठी राष्ट्रीय पातळीवर जात आहे ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. दिल्लीसह उत्तर भारतात राहणाऱ्या मराठी भाषिकांना हा सोहळा अनुभवता येणार आहे. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी शासन संस्थेच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्रस्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्यात येत आहे. विश्र्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. इतर योजनांसोबत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा आपला अभिमान असल्याने त्यासाठी आवश्यक सहकार्य करणे शासनाचे कर्तव्य आहे आणि शासन ते प्रामाणिकपणे पार पाडेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी सरहद संस्थेतर्फे जम्मू काश्मिरमध्ये करण्यात येणाऱ्या सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, मराठी भाषा अनिवार्य करणारा कायदा महाराष्ट्रात एकमताने मंजूर झाला. गेल्या दोन वर्षात ज्या शाळेमध्ये मराठी शिक्षक नसल्याने मराठी शिकवले जात नव्हते त्या शाळांमध्ये मुलांना मराठीचे अध्ययन करता यावे यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करत आहे. दुकानाच्या पाट्या मराठी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मराठी साहित्य परिषद म्हणजे मराठी भाषा भवनच आहे. भारतातील मराठी प्रेमींना जोडून घेण्यासाठी सरहदचे कार्य मोलाचे आहे. त्यामुळे दिल्लीतील हे संमेलन नक्कीच यशस्वी होईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी श्रीमती तांबे यांनी संमेलनाच्या स्थळ निवडीबाबत प्रक्रिया सांगून संमेलनाचा निधी ५० लाखाहून वाढवून २ कोटी केल्याबद्दल शासनाचे आभार मानले. संजय नहार यांनी सरहद संस्थेच्या कार्याची माहिती देऊन हे संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.कार्यक्रमाला माजी संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक आणि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# कर्नल भोसले चौक गणेश तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी आदित्य भोसले यांची निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी:पंढरपूर शहरातील लोकप्रिय असे म्हणून गणले गेलेली कर्ण भोसले चौक तरुण गणेशोत्सव मंडळ त्या मंडळाची नुकतीच अध्यक्षपदाची कार्यकारणीची निवड कार्यक्रम पार पडला करणार भोसले चौक तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी आदित्य रणजीत भोसले



तसेच उपाध्यक्ष सुभाष शिंदे यश पवार सचिव युवराज भोसले खजिनदार शैलेश भोसले अधिक पदाधिकाऱ्यांचे एकमताने निवड करण्यात आली कर्नल भोसले चौक गणेश उत्सव त्यांना मनाचे जेष्ठ कार्यकर्ते व नगराध्यक्ष नागेश्र्वर भोसले तसेच श्री विठ्ठल हॉस्पिटल संघर्ष समितीचे व पंढरपूर शहर सकल मराठा समाजाचे अध्यक्ष किरण आप्पा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शनानुसार विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.

करणार भोसले चौक गणेशोत्सव तरुण मंडळाचे नूतन अध्यक्ष आदित्य भोसले यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या निवडीनंतर आपल्या मनोगतांमध्ये त्यांनी करणार भोसले चौक गणेश उत्सव तरुण मंडळाचे अध्यक्षपद हे महत्त्वाचे आणि जबाबदारीचे पद असून या पदाची करणार भोसले चौक गणेशोत्सव तरुण मंडळाच्या नावलौकिका मध्ये भर टाकण्याची कार्य आपण करणार आहोत व या गणेश मंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य भाविक व भक्त यांची सेवा करण्याची भाग्य मला लाभले आहे आमच्या मंडळाचे आधारस्तंभ व मार्गदर्शक नागेश एका भोसले व किरण आप्पा भोसले तसेच पृथ्वीराज भोसले पृथ्वीराज उर्फ मुन्ना भोसले सुधीर आबा भोसले आणि जेष्ठ मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली मला काम करण्यात मिळत आहे हे माझे भाग्य समजतो असे करणार भोसले चौक गणेशोत्सव तरुण मंडळ च्या नूतन अध्यक्ष आदित्य रणजीत भोसले यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले.

भोसले चौक तरुण मंडळ हे मंडळ नेहमीच नवीन तरुणांना संधी देते असते कारण भोसले चौक तरुण मंडळ मध्ये शेकडोच्या संख्येने सभासद असून या मंडळाच्या वतीने पंढरपूर शहरातील सर्वात मोठे ढोल ताशा पथक म्हणून ओळखले जाते या मंडळाची ढोल ताशाची मिरवणुकी संपूर्ण पंढरपूर शहरांमध्ये लक्ष वेधून घेत असते करण भोसले चौक गणेश उत्सव तरुण मंडळाचे सर्व सदस्य व सभासद नूतन अध्यक्ष पदाचा अन्य पदाच्या निवडीत करिता उपस्थित होते

# इटकूर प्रशालेचे क्रीडा स्पर्धेमध्ये यश

**दैनिक यशसिद्धी न्युज**

कळंब/सुधाकर रणदिवे, कळंब येथे संपन्न झालेल्या तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये जि. प. प्रशाला इटकूर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन करून जिल्हास्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यामध्ये बुद्धिबळ स्पर्धेमध्ये १४




वर्षे वयोगटातील अनन्या दत्तात्रय आडसूळ तर १७ वर्षे वयोगटातील अभिजीत बाबासाहेब आडसूळ या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली. १७ वर्षे वयोगटातील कुस्ती स्पर्धेमध्ये अक्षरा अशोक गाडे या विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला असून तिची देखील जिल्हा स्तरासाठी निवड झाली आहे. त्याचबरोबर १४ वर्षे वयोगटातील व १७ वर्षे वयोगटातील कबड्डी या दोन्ही स्पर्धांमध्ये प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी अजिंक्य राहून तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला आहे. १४ वर्षे वयोगटातील कबड्डी संघामध्ये मल्हार सचिन गवारे, कार्तिक रविकांत गंभीरे, सुगत विकास शिंदे, सुबोध गौतम शिंदे, ऋतुराज मधुकर आडसूळ, युवराज अमर पोते, ओम रामकिसन माने, कृष्णा अमोल पोते, ओमराजे संतोष थोरात, आदर्श लिंबराज जाधव, प्रविण संतोष फरताडे, सार्थक हनुमंत माने या खेळाडूंचा समावेश आहे तर १७ वर्षे वयोगटातील कबड्डी संघामध्ये शंकर अंगद आडसूळ, श्रेयश सतीश बावळे, शिवम बिभीषण शेंडगे, संकेत श्रीधर बावळे, रोहित संजय पांढरे, कृष्णा बाळासाहेब एकशिंगे, स्वराज समाधान फरताडे, आर्यन बालाजी बावळे, प्रशांत पांडुरंग गंभीरे, ओंकार विलास आडसूळ, पृथ्वीराज उमेश आडसूळ या खेळाडूंचा समावेश आहे. या दोन्ही संघांची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा निदेशक अशोक पसारे, गणेश कोठावळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशालेच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, विस्तार अधिकारी सुशील फुलारी, केंद्रप्रमुख पांडुरंग गामोड, मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती, इटकूर ग्रामस्थ अशा सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे.

# पंढरपूर येथे दिव्यांग शिबिराचे आयोजन

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी: पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय येथे दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजी महसूल विभाग, पंचायत समिती पंढरपूर तसेच उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके यांनी दिली.जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग तपासणी शिबिर आयोजित केले असून यामध्ये मेंदू, हात व पाय, डोळे, कान व इतर सर्व व्यंगांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच त्यांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्र्विक ओळखपत्र वाटप करण्यात येणार आहे. या तपासणी शिबिरात सोलापूर येथील तज्ञ डॉक्टर तसेच वैश्यपायन वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. तालुक्यातील जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहनही उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके यांनी केले आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथील आयोजित शिबिरामध्ये दिव्यांग बांधवांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही डॉ.सुडके यांनी यावेळी सांगितले

# मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना थेट प्रक्षेपण उल्हासनगर महापालिकेत राज्यस्तरीय शुभारंभ

**दैनिक यशसिद्धी न्युज**

उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे :राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबुत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रम मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते पुणे येथे आज दि. रोजी दुपारी ०२.०० वाजता संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आपण उल्हासनगर महानगरपालिकेतील महासभागृहात आयोजित करण्यात आला होते. या कार्यक्रमात स्थानिक समिती अध्यक्ष मा. आमदार श्री. कुमार आयलानी हे प्रमुख पाहुणे तसेच अशासकीय सदस्या श्रीमती मनीषा भानुशाली , श्रीमती. किरण कौर धामी व श्रीमती कल्याणी कदम , तहसीलदार उल्हासनगर व मा. उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग श्री. सुभाष जाधव, जनसंपर्क अधिकारी, श्रीम. छाया डांगळे, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४ श्री. गणेश शिपी. श्री. मनिष हिवरे व श्री जेठानंद करमचंदानी , अनिल खतुराणी , सिस्टम ॲनालिस्ट श्रीम. श्रध्दा बाविस्कर: व्यवस्थापक-एन.यू.एल.एम विभाग श्रीम. संजिवनी अमृतसागर व विभाग प्रमुख, महिला व बालकल्याण विभाग श्री. नितेश रंगारी तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), कल्याण श्री अजय पडोळ व त्यांचे सहकर्मचारी उपस्थित होते तसेच ह्या कार्यक्रमास अंगणवाडी सेविका आणि प्रत्यक्ष लाभार्थी महिला यांनी आपले वैयक्तिक मनोगत व या योजनेचं लाभ मिळाला याचे आभार मानण्यासाठी आले होते

प्रथम मान्यवरांचे शाल व पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर राष्ट्रगीत सुरु करून कार्यक्रम सुरु केला मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी लोकांना आव्हान दिले कि हि योजना आम्ही कायम अशीच चालू ठेऊ तुम्ही आमच्यावर अशेच आशीर्वाद ठेवा असे सांगितले.श्री. सुभाष जाधव यानी मुख्यमंत्री




माझी लाडकी बहीण योजने संदर्भात प्रस्तावना मांडली. तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) कल्याण श्री. अजय पडोळ यानी - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनाचे शासन निर्णय संदर्भात उपस्थित सर्व अंगणवाडी सेविका, उमपा अधिकारी व कर्मचारी यांना समजावून सांगितले व या योजनेमध्ये काम करत असताना ज्या समस्या आल्या आणि त्याचे त्यांनी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी सर्व समस्यांवर मात करून आम्ही शासनाने दिलेले डेड लाईन पूर्वीच काम पार पाडले हे सांगितले .त्यामध्ये त्यांनी सर्व टीम चे आभार वयकत केले.कार्यक्रम संपल्यानंतर मा. आयुक्तानी सगळ्यांचे आभार प्रकट करून ह्या योजनेबद्दल माहिती दिली व आलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करून आजच्या कार्यक्रमाची सांगता केली.